# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## दिनांक ०२/०४/२०२४ (मंगळवार) दुपार

---

### अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद
### वाहनासह एकुण ९०,९३,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त
### नागपूर ग्रामीण विशेष पथकाची कारवाई

दिनांक ०१/०४/२०२४ रोजी मा. पोलीस अधिक्षक यांचे विशेष पथकातील स्टाफ पोस्टे भिवापूर हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय सूत्रधाराकडून माहीती मिळाली की, पोलीस ठाणे बिसी जिल्हा चंद्रपूर कडून भिवापूर मार्गे अमरावतीकडे अवैधरीत्या विनापरवाना रेती एलपीमध्ये लोड करून वाहतूक करीत आहे. अशा खात्रीशीर बातमीवरून सालेभट्टी फाटयाजवळ नाकाबंदी केली असता दोन संशयित टिप्पर एकामागे एक येतांनी दिसुन आले. टाटा कंपनीची १६ चक्का एल पी वाहन क्र. एम.एच.— २७/डि.पी. —११९९ चा चालक **आरोपी नामे— १) सय्यद मोबीन सय्यद अलीम, वय ३३ वर्ष, रा. कलीमनगर, ट्रान्सपोर्टनगर जवळ अमरावती २) मनिल जंगु धुर्वे, वय २४ वर्ष, रा. कसाईखेडा, तह. धारणी, जि. अमरावती,** टाटा कंपनीची १६ चक्का एल पी वाहन क्र. एम.एच. २७ डि.एम. ५२७९ चा चालक **आरोपी नामे—३) संजय रामाजी गाढवे, वय ४० वर्ष, रा. वार्ड क्र. ६ नेरपिंगळाई, तह. मोर्शी, जिल्हा अमरावती, ४) अक्षय अरुण धुर्वे, वय ३० वर्ष, रा. वार्ड क्र. ५ नेरपिंगळाई, तह. मोर्शी, जिल्हा अमरावती** यांना स्टाफने थांबवून पाहणी केली असता दोन्ही वाहनामधील एकुण अंदाजे ३० ब्रास रेती मिळून आल्याने सदर वाहन चालकास ट्रक मधील रेतीचे रॉयल्टी बाबत विचारले असता रॉयल्टी नसल्याचे सांगितल्याने व सदरची रेती ही चोरीची असल्याची खात्री झाल्याने आरोपींच्या ताब्यातून १) टाटा कंपनीची १६ चक्का एल पी वाहन क्र. एम.एच.— २७/डि. पी. —११९९ किंमती अंदाजे ४८,००,०००/—रू. मध्ये १५ ब्रास रेती किंमती ७५,०००/—रू. २) वेगवेगळे कंपनीचे मोबाईल किमती ४३,०००/—रू. ३) टाटा कंपनीची १६ चक्का एल पी वाहन क्र. एम.एच. २७ डि.एम. ५२७९ किंमती ४१,००,०००/—रू. मध्ये अंदाजे १५ ब्रास रेती किंमती ७५,०००/—रू. असा एकुण ९०,९३,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त करून **आरोपी नामे— १) सय्यद मोबीन सय्यद अलीम, वय ३३ वर्ष, रा. कलीमनगर, ट्रान्सपोर्टनगर जवळ अमरावती २) मनिल जंगु धुर्वे, वय २४ वर्ष, रा. कसाईखेडा, तह. धारणी, जि. अमरावती,** टाटा कंपनीची १६ चक्का एल पी वाहन क्र. एम.एच. २७ डि.एम. ५२७९ चा चालक **आरोपी नामे—३) संजय रामाजी गाढवे, वय ४० वर्ष, रा. वार्ड क्र. ६ नेरपिंगळाई, तह. मोर्शी, जिल्हा अमरावती, ४) अक्षय अरुण धुर्वे, वय ३० वर्ष, रा. वार्ड क्र. ५ नेरपिंगळाई, तह. मोर्शी, जिल्हा अमरावती** असे एकुण ०४ आरोपी यांचेविरुद्ध पोस्टे भिवापूर येथे लम ३७९,१०९,३४ भारतीय दंडविधान संहीता—१८६०, सहकलम ४८(७).४८ (८) महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम—१९६६, सहकलम ४,२१ खानी आणि खनीजे (विकास आणि नियमन) अधिनियम—१९५७, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतीबंधक अधिनियम १९८४ अन्वये पो. स्टे. भिवापूर येथे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक किशोर शेरकी, पोलीस हवालदार ललीत उईके, पोना प्रणय बनाफर, पोलीस अंमलदार कार्तिक पुरी, बालाजी बारगुले विशेष पथक नागपूर ग्रामीण यांनी केली.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर